केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत (Infrastructure & Maintenance) करीता सर्वसाधारण (General) योजनेंतर्गत सन २०१७-१८ मधील राज्य हिश्श्यापोटी रु.२०९९१.३८ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः एनआरएचएम-२०१७/प्र.क्र.५३२/आ-७

१० वा मजला , गो. ते. रूग्णालय संकूल इमारत

नवीन मंत्रालय, मुंबई ४००००१.

दिनांक : ३१ जानेवारी, २०१८

वाचा :-

१) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०१७/२/२०१७-NHM (Finance) /१-७ दिनांक २४ एप्रिल, २०१७ चे पत्र.

२) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०१७/२/२०१७-NHM (Finance) /१-१ दिनांक २५ एप्रिल, २०१७ चे पत्र.

३) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०१७/२/२०१७-NHM (Finance) /१-७ दिनांक १९ जुलै, २०१७ चे पत्र.

४) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२७०१७/२/२०१७-NHM (Finance) /१-७ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ चे पत्र.

५) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ रा.हि./९४२३९-२४५/२०१७-१८, दिनांक २७ डिसेंबर, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह, अशा आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल,२००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने आरोग्य विषयक सर्व केंद्र पुरस्कृत योजना एकत्रित करुन त्यास "राष्ट्रीय आरोग्य अभियान" असे नाव दिले. या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेकरीता सर्वसाधारण

योजनेंतर्गत (Infrastructure & Maintenance) सन २०१७-१८ साठी केंद्र शासनाने ६०% केंद्र हिश्श्यापोटी तीन हफ्ते वितरीत केले असून त्यास समरुप ४०% राज्य हिश्श्यापोटीचे अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या Infrastructure & Maintenance या केंद्र पुरस्कृत योजना व कार्यक्रम याकरीता सर्वसाधारण योजनेंतर्गत (General) सन २०१७-१८ साठी ४०% राज्य हिस्सा प्रमाणे रु. २०९९१.३८ लक्ष (रुपये दोनशे नऊ कोटी एक्क्यांण्णव लक्ष अडतीस हजार फक्त) वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ.व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य; ८००- इतर खर्च; पंचवार्षिक योजनांतर्गत योजना; (०१) (१५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा ४०%) (२२१०५२४६) - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली रु. २०९९१.३८ लक्ष सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून वितरीत करण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. शासन निर्णय, उदयोग उर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील तरतूदीनुसार सदर प्रस्तावावरील खर्च / खरेदीसंदर्भात आवश्यक तेथे प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३११५१२४१५०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakant Sakharkar

Digitally signed by Amol Nilakant Sakharkar
DN: cn=Amol Nilakant Sakharkar, o=Public Health Department, ou=Government of Maharashtra, email=amol.sakharkar@nic.in, c=IN
Date: 2018.02.01 15:06:10 +04'30'

(अ.नि.साखरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणॆ .
६. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१२.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१३.निवडनस्ती (आरोग्य -७).